देवरूख शिक्षण प्रसारक मंडळाचे,
**न्या. तात्यासाहेब आठल्ये कला, वेद. शं.रा. सप्रे वाणिज्य आणि**
**विधिज्ञ दादासाहेब पित्रे विज्ञान महाविद्यालय, (स्वायत्त)**
**कै.काकासाहेब पंडीत शैक्षणिक संकुल. देवरूख. ४१५ ८०४ (जि. रत्नागिरी)**
**मुंबई विद्यापीठ सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार २००९-१०**
Reaccredited by NAAC with ‘A’ Grade-3rd Cycle

# महाविद्यालय विकास समिती
## वार्षिक अहवाल २०१९-२०

सार्वजनिक विद्यापीठ अधिनीयम २०१६ मधील कलम ९७ अन्वये महाविद्यालय विकास समिती महाविद्यालयात गठीत करण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये महाविद्यालय विकास समितीच्या २ बैठकी पार पडल्या सदर बैठकीत झालेल्या कामकाजाचा आढाव पुढील प्रमाणे.

- **महाविद्यालय विकास समितीची प्रथम सभा दि.११/०९/२०१८ रोजी पार पडली.**

  - पदवी महाविद्यालय स्थानिक व्यवस्थापन समितीच्या दिनांक ३१/०३/२०१९ च्या सभेतील कामकाजाची माहिती सभे समोर सादर करण्यात आली व इतिवृत्तास मंजुरी देण्यात आली.
  - शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून महाविद्यालयाला प्राप्त झालेल्या स्वायत्त दर्जानंतरच्या महाविद्यालयीन कामकाजाचा आढावा सभेसमोर सादर करण्यात आला महाविद्यालयाला स्वायत्तता मिळाल्यानंतर करण्यात आलेले अभ्यासक्रमातील बदल, नवीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम, नवीन परीक्षा पद्धती इ. विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली व कामकाजाबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले.
  - एप्रिल/मे २०१९ चा पदवी विभागाचा विद्यापीठ निकाल सभेसमार सादर करण्यात आला.
  - आर्थिक वर्ष २०१८-१९ च्या अनुदानित व विनाअनुदानित विभागाचे सनदी लेखापालांनी प्रमाणित केलेले जमाखर्च पत्रक, ताळेबंद यांना सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.
  - महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०१९-२० ची प्रवेशीत विद्यार्थी संख्येचा तपशिल सभेसमोर ठेवण्यात आला.
  - दिनांक ०१/०१/२०१९ ते ३१/१२/२०१९ या कालावधीतीत कर्मचाऱ्यांनी उपभोगलेल्या रजा नयमाबरहुकूम असल्यामुळे रजांना मंजूरी देण्यात आली.
  - महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी समितीचा शैक्षणिक वर्ष २०१८-१९ चा अहवाल आणि सन २०१९-२० चे शैक्षणिक कॅलेंडर सभेसमोर सादर करण्यात आले.
  - शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी महाविद्यालयातील संगणक विज्ञान व पद्व्युत्तर विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची कार्यभारानुसार नियुक्ती व वेतन निश्चिती करण्यासंबधी चर्चा व ठराव करण्यात आला.
  - देवरूख शिक्षण प्रसारक मंडळ आणि माखजन पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळयांच्या संयुक्त त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१पासून माखजन येथे आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालयाचे उपकेंद्र सुरू

करण्याविषयी प्रस्ताव मा.अध्यक्षांनी सभेसमोर मांडला यावर सविस्तर चर्चा होऊन विद्यापीठाला सॅटेलाईट सेंटरचा प्रस्ताव पाठविण्याचा ठराव करण्यात आला.

- महाविद्यालयातील शिक्षक प्रतिनिधी / कर्मचारी प्रतिनिधी यांच्याकडून आलेल्या विषयांवर चर्चा करण्यात आली.
- मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा व निर्णय घेण्यात आले.

- **दि. ०८ डिसेंबर २०२० रोजी सायंकाळी ४.०० वाजता ऑनलाईन पद्धतीने झुम अॅपद्वारे घेण्यात आली.**
  - महाविद्यालय विकास समितीच्या दिनांक २८/०१/२०२० च्या सभेतील इतिवृत्ताचे वाचन व त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.
  - आर्थिक वर्ष २०१९-२० चे अनुदानित व विनाअनुदानित विभागाचे अंदाजपत्रक सभेसमोर सादर करण्यात आले व त्यास मंजुरी देण्यात आली.
  - दिनांक ०१/०१/२०२० ते ३१/०६/२०२० या कालावधीतीत कर्मचाऱ्यांनी उपभोगलेल्या रजा नयमाबरहुकूम असल्यामुळे रजांना मंजूरी देण्यात आली.
  - महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी समितीचा शैक्षणिक वर्ष २०१९-२० चा अहवाल आणि सन २०२०-२१ चे शैक्षणिक कॅलेंडर सभेसमोर सादर करण्यात आले.
  - नविन शैक्षणिक धोरण २०२०, नूसार येत्या पाच वर्षासाठी महाविद्यालयाचा बृहद आराखडा बनवण्याच्या दृष्टीने विचार विनीमय करण्यात आला व विद्यार्थी आणि शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळी यांचे कडुन सूचना घेऊन पायाभूत सुविधा व आर्थिक सहाय्य यांचा विचार करून एका विशिष्ठ पद्धतीने पुढील ५ वर्षाचा (शै.व. २०२०-२१ ते २०२४-२५) वृहत आराखडा तयार करण्याचे ठरविण्यात आले.
  - येत्या शैक्षणीक वर्षात नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याच्या दृष्टीने आवश्यक पायाभुत सुवीधा संबधी विचार विनीमय करण्यात आला.
  - शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये रिक्त पदांवर नियुक्ती करण्यात आलेल्या शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-यांना शैक्षणिक कामकाज सुरळीतपणे चालण्यासाठी पात्र व्यक्तींना संस्थेच्या सेवेमध्ये तात्पुरत्या स्वरुपात नियुक्तीला मंजुरी देण्यात आली.
  - महाविद्यालयातील शिक्षक प्रतिनिधी / कर्मचारी प्रतिनिधी यांच्याकडून आलेल्या विषयांवर चर्चा करण्यात आली.
  - मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा व निर्णय घेण्यात आले.

NYA. ATHALYE, VED. SAPRE, VID. PITRE COLLEGE DEVRUKH

प्राचार्य